# कोल्हापूर जिल्हा नागरी बँक्स् सहकारी असोसिएशन लि;

१४५८/बी, जी. एन. चेंबर्स, कोळेकर तिकटी, मंगळवार पेठ, कोल्हापूर-४१६ ०१२.

# ३१ वा वार्षिक अहवाल 2017 - 18




ऑडिट वर्ग 'अ'



श्री. निपुणराव कोरे
अध्यक्ष

# संचालक मंडळ



श्री. महेश धर्माधिकारी
उपाध्यक्ष



श्री. विजय भोसले
संचालक



श्री. अशोक सौंदत्तीकर
संचालक



श्री. राजेंद्र जाधव
संचालक



श्री. विठ्ठल मोरे
संचालक



श्री. अरुण अलासे
संचालक



श्री. शिरीष कणेरकर
संचालक



श्री. सुर्यकांत पाटील
संचालक



श्री. विलास नाईक
संचालक



श्री. दत्तात्रय थोरावडे
संचालक



श्री. प्रकाश पुजारी
संचालक



श्री. आनंदराव भोपळे
संचालक



सौ. विजया जाधव
संचालक



सौ. दिपा मिसाळ
संचालक



श्री. दत्तात्रय राऊत
स्वीकृत संचालक



श्री. विश्वास चौगले
स्वीकृत संचालक



श्री. शंकरराव मांगलेकर
मुख्य कार्यकारी अधिकारी

# कोल्हापूर जिल्हा नागरी बँक्स् सहकारी असोसिएशन लि., कोल्हापूर

सि. स. नं. १४५८ बी वॉर्ड, जी. एन. चेंबर्स, दुसरा मजला, कोळेकर तिकटी,
मंगळवार पेठ, कोल्हापूर.

जा. क्र. बॅक्स असो./सर्वसभा/२०१८-१९ /८४ दिनांक : १४ सप्टेंबर २०१८

## वार्षिक सर्वसाधारण सभा सूचना

(फक्त सभासदांसाठी)

कोल्हापूर जिल्हा नागरी बँक्स सहकारी असोसिएशन लि., कोल्हापूर या संस्थेची ३९ वी वार्षिक सर्वसाधारण सभा शुक्रवार दि. २८ सप्टेंबर २०१८ रोजी सांय. ४.०० वाजता सि. स. नं. १४५८ बी वॉर्ड, जी. एन. चेंबर्स, दुसरा मजला, कोळेकर तिकटी, मंगळवार पेठ, कोल्हापूर येथील असोसिएशनच्या कार्यालयात खालील विषयांवर विचार करणेसाठी आयोजित केलेली आहे. सदर सभेस असोसिएशनच्या सभासद बँकांचे अध्यक्ष यांनी स्वतः अथवा सदर सभेस उपस्थित राहणेबाबत संचालक मंडळाचे ठरावाने अधिकार दिलेल्या संचालक यांनी उपस्थित रहावे अशी विनंती आहे.

## सभेपुढील विषय

१) दिनांक २९ सप्टेंबर २०१७ रोजीच्या ३८ व्या वार्षिक सर्व साधारण सभेचा इतिवृत्तांत वाचून कायम करणे.
२) सन २०१७-१८ चा वार्षिक अहवाल स्विकृत करणे.
३) दिनांक ३१ मार्च २०१८ रोजीचा लेखापरिक्षीत, ताळेबंद व सन २०१७-१८ या वर्षाचे उत्पन्न खर्च पत्रक स्वीकृत करणे.
४) सन २०१७-१८ सालात अंदाज पत्रकापेक्षा जादा झालेल्या खर्चास आणि सन २०१८-१९ सालचे अंदाजपत्रकास मंजूरी देणे.
५) दिनांक ३१ मार्च २०१८ अखेर मिळालेल्या वाढावा विभागणीस मान्यता देणे.
६) सन २०१७-१८ च्या वैधानिक लेखा परिक्षक यांनी दिलेल्या वैधानिक लेखापरिक्षण अहवालाची नोंद घेणे व त्यावरील संचालक मंडळाने तयार केलेल्या दोष दुरुस्ती अहवालास मान्यता देणे.
७) सन २०१८-१९ सालासाठी वैधानिक लेखापरिक्षकांची नेमणूक करणे व त्यांचा मेहनताना निश्चित करणे.
८) सन २०१८-१९ सालच्या असोसिएशनच्या नियोजित कार्यक्रमास मान्यता देणे.
९) वार्षिक सर्वसाधारण सभेस अनुपस्थित असणाऱ्या सभासदांची गैरहजेरी क्षमापित करणेबाबत विचार करणे.
१०) मान. अध्यक्षांचे परवानगीने येणारे ऐनवेळच्या विषयावर विचार करणे.

मा. संचालक मंडळाच्या आदेशावरुन

कोल्हापूर
दिनांक : १४ सप्टेंबर २०१८

श्री. शंकर रा. मांगलेकर
मुख्य कार्यकारी अधिकारी

टिप : १) सभेच्या ठरलेवेळेस गणपुर्ती न झालेस सभा तहकूब केली जाईल आणि अर्ध्या तासानंतर अशी तहकूब केलेली सभा सभेच्या सूचना पत्रात नमूद केले ठिकाणी घेणेत येईल. सदर सभेत वरील विषयांचा विचार करणेत येईल. अशा सभेला गणपूर्तीची आवश्यकता असणार नाही.

२) सभासद बँकांनी सभेस उपस्थित राहणाऱ्या पदाधिकारी /संचालक यांची नांवे दिनांक २२ सप्टेंबर २०१८ पर्यंत संचालक मंडळाच्या ठरावासह असोसिएशनकडे पाठवावीत.

३) सभासद बँकाना अहवालावरती सुचना अथवा प्रश्न विचारावयाचे असतील तर त्यांनी लेखी स्वरूपात दि. २२ सप्टेंबर २०१८ पूर्वी असोसिएशनच्या मुख्य कार्यालयात पोहचतील अशा रितीने पाठवावयाचे आहेत.

# ३९ वा वार्षिक अहवाल

**असोसिएशनच्या सदस्य सहकारी बँकातील सन्माननीय प्रतिनिधी सभासद बंधू-भगिनींनो ....**

आपल्या असोसिएशनच्या सदस्य सहकारी बँकांचे मा. अध्यक्ष, उपाध्यक्ष, संचालक, अधिकारी आणि प्रतिनिधी आजच्या ३९ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेस उपस्थित झालात, त्याबद्दल असोसिएशनच्या संचालक मंडळाच्या वतीने मी आपले प्रथमत: सानंद स्वागत करतो.

*** जागतिक अर्थव्यवस्था :-**

सन २००८ अर्थात दहा वर्षापूर्वी आर्थिक महासत्ता अमेरिकेतील लेहमन ही वित्तीय संस्था गडगडली आणि जगातील अर्थकारण कोसळले. परंतु त्यावेळी भारतीय बँकींग व्यवसायावर फारसा परिणाम झाला नाही. याचे प्रमुख कारण होते रिझर्व्ह बँकेने बँकीग बाबत उपयुक्त पतधोरण ( Accommedative Credit Policy) अंगीकारलेले होते, परंतु २०१७-१८ पासून रिझर्व्ह बँकेने भारतीय बँकींगबाबत आपली भूमिका क्रांतीकारकरित्या बदलून तटस्थ (Neutral Stance) नियामक म्हणुन पार पाडण्यास सुरूवात केलेली आहे. त्यामुळे जागतिक अर्थव्यवस्थेमधील चढउताराचा परिणाम भारतीय बँकींगवर आता तात्काळ होवू लागला आहे. भारतीय बँकानी सरकारी आर्थिक पाठबळाखेरीज स्वत: चे भांडवलावर सक्षम होवून जागतिक स्पर्धेत टिकून रहावे अशी अपेक्षा रिझर्व्ह बँक व केंद्र सरकारची आहे, हे आता स्पष्ट झाले आहे.

जागतिक अर्थव्यवस्थेच्या अभ्यासांती असे दिसते की, अमेरिका आणि चीन हे देश जागतिक पातळीवर व्यापार व अर्थकारणावर कब्जा करणेचा आटोकाट प्रयत्न करित आहेत. रशिया व अमेरिकेतील शीतयुद्ध चालूच आहे. युरोपीयन युनियनमधुन ब्रिटन बाहेर पडलेने यूरो चलनाचे अवमुल्यन वाढत आहे. अमेरिकेचे स्वदेशींना रोजगार देण्याच्या धोरणामुळे भारतीयांना रोजगार संधी कमी झालेल्या आहे. कच्च्या तेलाच्या किंमतीत वाढ होत आहे. अमेरिकेची अर्थसंकल्पीय आर्थिक तूट वाढल्याने अमेरिकेच्या मध्यवर्ती बँकेने (Fedral Reserve) व्याजदर वृद्धी केली आहे. त्यामुळे डॉलर वधारून रूपया सतत घसरत आहे. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या मते भारताचा विकासदर नजीकच्या काळात वाढणार असलेची चिन्हे असली तरी आफ्रिका खंड, दक्षिण आशियाचा विकासदर वाढण्याची शक्यता नाही. जागतिक पातळीवर अमेरिका, रशिया, चीन यांची राजकीय समीकरणे व संबंध चांगले नाही. परिणाम: सन २०१८ ते २०२० पर्यंत जागतिक अर्थव्यवस्थेत फार मोठे चढउतार राहणार आहेत.

*** भारतीय बँकींग :**

सन २०१६-२०१७ सालातील ५००/१००० रूपयांच्या विमुद्रीकरणानंतर बाजारातील रोखता कमी झालेने व सन २०१७-१८ मध्ये व्यापारी बँकातील अनेक आर्थिक घोटाळ्यामुळे सतत भारतीय बँकींग आंतरराष्ट्रीय तसेच देशपातळीवर चर्चेत राहिले. त्याच्या साथीला या बँकांतील ढोबळ अनुउत्पादक जिंदगी (NPA) मध्ये झालेली भरमसाठ वाढ ही चिंतेंची बाब सर्वसामान्य जनतेत घबराट निर्माण करित राहिली. वस्तू व सेवाकर सरकारच्या नवीन कर निर्धारण प्रणाली धोरणांची अमलबजावणी दि. १ जुलै २०१७ पासून सुरू झाली. कर निर्धारण, आकारणी नियम आणि सरकारी करवसुली यंत्रणेचे अधिकारी यांची त्यामधील अनभिज्ञता यामुळे भारतीय बँकींग-आर्थिक क्षेत्रात गोंधळाचेच वातावरण अनुभवयास मिळाले वर नमुद केलेप्रमाणे चलन विमुद्रीकरणानंतर बाजारातील रोखता (Liquidity) प्रचंड प्रमाणात कमी झाल्याने उत्पादन आणि सेवा क्षेत्राला फार मोठ्या पिछेहाटीला सामोरे जावे लागले. त्याचवेळी (RERA) कायदा अमलात आणला गेल्याने बांधकाम विकसन व्यवसायाला महामंदिला तोंड द्यावे लागले. सरकारची आर्थिक तूट ११२% पर्यंत वाढल्याने सरकारी रोखे विक्री सुरू केली. परिणामत: रोख्यांचा परतावा (YTM) फार वाढला. त्यामुळे नागरी बँकांना ३१ मार्च २०१८ वर्षाखेरीस मोठ्या प्रमाणात गुंतवणूक घसारा तरतूद करावी लागली. सरकारी/व्यापारी बँकांना गुंतवणूक घसारा निधीची तरतूद सन २०१८-१९ मध्ये करण्याची सवलत दिली परंतु त्याचा फायदा सहकारी बँकांना देण्याचे जाणीवपूर्वक रिझर्व्ह बँकेने टाळले. त्यामुळे सहकारी बँकांच्या नफ्यात चांगलीच घसरण झाली. थोडक्यात सन २०१७-१८ आर्थिक साल भारतीय बँकींग क्षेत्राला अनेक चढउतारांचे अनुभव घेणारे आणि सामान्यांची विश्वासर्हता कमी करणारे ठरले असे म्हटले तर वावगे ठरणार नाही.

आज भारतात २७ सरकारी बँका २६ खाजगी बँका, ४६ विदेशी बँका, ५६ प्रादेशिक ग्रामीण बँका आणि १५७४ सहकारी बँका आहेत. १२ सरकारी बँकावर अनुत्पादक जिंदगीमध्ये (NPA) १०% पेक्षा जास्त वाढ झाल्याने रिझर्व्ह बँकेने बंधने लादलेली आहेत. सरकारी बँकांसाठी पुढील दोन वर्षात २ लाख ११ हजार कोटीचे भांडवल सरकार पुरवणार आहे. परंतु सहकारी बँकांना कोणतीही मदत करण्याची मानसिकता केंद्र सरकार किंवा रिझर्व्ह बँकेची नाही. सहकारी बँका स्वबळावरच बँकींग सेवा सर्वसामान्यांना माफक खर्चात पुरवित आहेत. जनतेचा विश्वास हेच खरे भांडवल सहकारी बँकोकडे आहे.

आपल्या जिल्ह्याचे अर्थकारण दुग्ध उत्पादन, साखर कारखानादारी, वस्त्रोद्योग, लघुउद्योजक, धान्य व्यापारांवर बहुंतांशी अवलंबून आहे. इचलकरंजी-कोल्हापूर वगळता अन्य भाग शेती उत्पादनावर

## सभासद व वर्गणी

अहवाल साल अखेर एकूण ४७ नागरी सहकारी बँका नियमीत सभासद आहेत. आपल्या जिल्ह्यात शाखा असणाऱ्या परंतु कोल्हापूर जिल्ह्याबाहेर नोंदणीकृत कार्यालये असणाऱ्या १० बँका सहयोगी सभासद झालेल्या आहेत. कायदा कलम १०१ वसुली दाखले प्राप्त करणेच्या कामी प्रामुख्याने या सहकारी बँका आपले सभासदत्व स्वीकारत असतात.

## * गंगाजळी व निधी

अहवाल वर्षात गंगाजळी व राखीव निधीत रु.२६,७०,१५७.०० ची वाढ होवून असोसिएशनकडे दि.३१ मार्च २०१८ वर्षाखेरीस रु.३,३५,५०,९६२.०० इतकी गंगाजळी व निधी निर्माण झालेला आहे.

## * उत्पन्न व खर्च

सभासद वर्गणी, गुंतवणूकीवरील व्याज, प्रोसेस फी, दावा खर्च भरपाई शुल्क, प्रशिक्षण शुल्क हे असोसिएशनचे उत्पन्नाचे प्रमुख स्त्रोत आहेत. यामधून अहवाल वर्षात असोसिएशनला रु.५०,९६,७१०/-इतके उत्पन्न मिळाले आहे. अहवाल वर्षात असोसिएशनच्या गुंतवणूकीत फक्त रु.१५,००,०००.०० ची वाढ होवून बँकांनी ठेव व्याजदर कमी केलेने गुंतवणूकीवरील व्याजात तुलनात्मक दृष्ट्या अपेक्षेप्रमाणे वाढ झालेली नाही. अहवाल सालात सन २०१० ते २०१५ या कालावधीतील सेवाकर रु. ७,५५,०००/-केंद्रीय उत्पादन शुल्क खात्याकडे भरणा करून

(TIRIBUNAL) प्राधिकरणांकडे सेवाकर माफीसाठी अपिल केलेने तुलनात्मक दृष्ट्या गुंतवणूक वाढ झालेली नाही. बँकांनी मोठ्या रकमांचे दावे वसुली कक्षाकडे दाखल केल्याने वसुली भरपाई खर्चातील जमा रकमेत मात्र वाढ दिसत आहे.

कर्मचारी वेतन, मानधन, अधिलाभांश, सानुग्रह अनुदान, स्थानापन्न भत्ता, प्रशिक्षण आणि घसारा व व्यवस्थापनावर रु.२८,७७,३४८.०० इतका खर्च झालेला आहे. असोसिएशनच्या वसुली कक्षाकडे सहकार खात्याकडील उपनिबंधक दर्जाचा अधिकारी असल्याने त्यांचे वेतन भत्त्यावर होणाऱ्या खर्चामुळे वसुली कक्ष सातत्याने तोट्यात आहे. वसुली दावे दाखल करणाऱ्या बँकाकडून वसुली कक्ष खर्च भरपाई शुल्क घेवून कांही प्रमाणात तोटा कमी करणेचा प्रयत्न केला जात आहे. तथापि अहवाल वर्षात सहाय्यक निबंधकांच्या स्तरावरील अधिकाऱ्यांकडे या पदाचा अतिरिक्त कार्यभार असल्याने त्यांचे वेतन, भत्त्याचा खर्च मोठ्या

सालात वसुली कक्षाकडील तोटा रु. २,१४,७८८.०० इतक्या रकमेपर्यंत मर्यादित राहिला आहे.

सन २०१७-१८ चे अंदाज पत्रकीय खर्चापेक्षा कांही बाबीवर जादा खर्च झाला आहे. त्याचा तपशील अहवालात दिलेला आहे.

वस्तू व सेवाकर (GST) कायद्याची अमलबजावणी दि. १ जुलै २०१७ पासून सुरू झाली आहे. हा कायदा असोसिएशनलाही लागू असून आपले व्याज व प्रोसेस फी वगळता अन्य उत्पन्न आणि जमा होणारे शुल्क वर्गणीवर या कराची आकारणी व वसुली असोसिएशनने घेतलेल्या सेवा व खरेदीवर हा कर असोसिएशला अदा करावा लागत आहे

## * वाढावा व वाढावा विभागणी

दिनांक ३१ मार्च २०१८ रोजी संपलेल्या अहवाल वर्षात असोसिएशनच्या व्यवस्थापन व आस्थापनेवर झालेला एकूण खर्च आणि कराव्या लागणाऱ्या वैधानिक तरतुदी एकूण उत्पन्नातून वजावट केलेनंतर वर्षाखेरीस रु.२५,८४,३६२.०० इतका वाढावा शिल्लक रहात आहे. त्याची विभागणी खालीलप्रमाणे करावी अशी शिफारस संचालक मंडळाने केलेली आहे.

| | |
|---|---|
| राखीव निधी | ११,४३,३६०.०३ |
| इमारत निधी | २,००,०००.०० |
| प्रशिक्षण निधी | ९९,४९२.०५ |
| परितोषिक निधी | १,००,०००.०० |
| संभाव्य देयता निधी | ५,९२,२४२.०० |
| प्रशिक्षण केंद्र निधी | १,९५,०६५.०० |
| संचालक अभ्यास दौरा निधी | १,२०,०००.०० |
| तंत्र विकास निधी | १,३४,२०३.०० |

आपल्या असोसिएशनकडे जमा होणाऱ्या इतर उत्पन्नावर विशेषतः प्रोसेस फी व वसुली कक्ष खर्च भरपाई शुल्कावर केंद्रीय उत्पादन शुल्क खात्याने सन २०१० पासून सेवाकर आकारणी केली असुन रु.१०,७२,३६८.०० इतका सेवाकर आणि त्यावरील दंड, व्याज भरणा करणेचा आदेश दिला आहे. त्यावर असोसिएशनने अपील केलेले होते. दि. १३/११/२०१७ रोजी अपीलांचा निर्णय झाला असून असोसिएशन सदस्यांना सेवा देतात, या नियमाखाली इतर सेवांना सेवाकरात सूट दिली आहे.

वसुली कक्ष वसुली अभिकर्ता (Recovery Agent) गृहीत धरुन त्यांचे सेवाकर आकारणी करणेचा या हुकूम केला आहे. हुकूमाविरूध्द असोसिएशनने प्राधिकरणाकडे (Tribunal) अपील केले असून त्याचा निकाल अद्याप झालेला नाही. असोसिएशनचे हक्क अबाधित (Under Protest) ठेवून सन २०१० ते २०१५ या कालावधीतील होणारी सेवाकराची अंदाजे रक्कम रु. ७,५५,४००/- केंद्रीय उत्पादन शुल्क खात्याकडे भरणा केलेली आहे.

## * अंतर्गत व वैधानिक लेखापरिक्षण

सन २०१७-१८ चे वैधानिक लेखापरिक्षण मे. सुशांत फडणीस आणि कं. सनदी लेखापाल, कोल्हापूर यांनी पूर्ण केले आहे. त्यांनी असोसिएशनच्या कामकाजाबद्दल समाधान व्यक्त करुन असोसिएशनला अहवाल वर्षासाठी लेखापरिक्षण वर्ग अ प्रदान केलेला आहे. त्यानी दिलेल्या मार्गदर्शक सहकार्याबद्दल आभारी आहे.

सन २०१७-१८ चे अंतर्गत लेखापरिक्षण सीए. संजय वेल्हाळ, सनदी लेखापाल यांनी

## * वसुली कक्ष व दावे आढावा

सहकार खात्याकडील उपनिबंधक दर्जाचा अधिकारी परसेवेवर या कार्यालयाकडे कार्यरत असतो. तसेच या कक्षाचे कामकाजासाठी स्वतंत्र कार्यालयीन इमारत, साधन सुविधा आणि कर्मचारी वर्ग दिला आहे. सध्या बँका काळजीपुर्वक कर्ज वाटप करित असून थकबाकी वसुलीसाठी सिक्युरायटेझशनचा जादा वापर करीत आहेत. परिणामतः वसुली कक्षाकडे येणाऱ्या दाव्याचे प्रमाण फारच कमी झाले आहे.

वसुली दाखले दावा अर्जाची मुद्रांक रक्कम शासनाकडे भरणा केली जाते. तर प्रोसेस फी अत्यल्प आहे. फक्त प्रोसेस फी असोसिएशनकडे जमा होते.त्यामुळे या कक्षाकडील खर्च भागविणेकरिता कक्ष वसुली खर्च भरपाई शुल्क बँकाकडून घेवून खर्चाची तोंड मिळवणी करण्याची कसरत दरसाल असोसिएशनला करावी लागत आहे. वसुली कक्षाकडे कमी वेतनाचा सहाय्यक निबंधक दर्जाचा अधिकारी द्यावा किंवा मुद्रांक शुल्क रकमेतून त्या अधिकाऱ्याचा खर्च करावा अशी मागणी शासनाकडे करणेत आली आहे. तसेच कोल्हापूर जिल्ह्यातील पतसंस्थाचे दावे असोसिएशनकडे दाखल झालेस प्रोसेस फीचे रकमेत वाढ होवून कक्षा कडील तोटा कमी होईल अशी अपेक्षा आहे. म्हणून त्यांचे कायदा कलम १०१ अंतर्गत वसुली दाखले देणेची प्रकरणे या परसेवेवरील अधिकाऱ्याकडे दाखल करून घेणेस मंजूरी मिळणे साठीचा प्रस्ताव सहकार

व कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. यांचे दावे असोसिएशनकडे घेण्याचे विचाराधीन आहे.

असोसिएशन वसुली कक्षाकडे दि. २१ जून २०१८ पासून डॉ. महेशकुमार यशवंतराव कदम, जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, सातारा यांची बदली या कक्षाकडे झाली आहे. ते पूर्णवेळ कामकाज पहात असून त्यांचा अनुभव, कामकाज पद्धती आणि तत्पर कार्यपद्धती लक्षात घेता दाव्यांचे निर्णय लवकरात लवकर होत आहेत. बँकांचे वसुली कार्यवाही तत्पर होणेस त्यांची मदत होणार आहे. तेव्हा बँकानी दावा प्रकरण जास्तीत जास्त दाखल करावीत असे सदस्य बँकांना विनंती करीत आहे.

दि, ३१ मार्च २०१७ पूर्वीचे १६९ इतके दावे प्रलंबित होते. सन २०१७-१८ अहवाल वर्षात ८९१ इतके नवीन दावे दाखल झालेले आहेत. अहवाल वर्षात रु. ३७.९६ कोटी रक्कमेचे निकाल देवून दाखले दिलेले आहेत. अहवाल वर्षाखेरीस रू. १२.४८ कोटी रकमेचे २१७ दावे प्रलंबित आहेत.

वसुली कक्षाकडील उपनिबंधक सौ. बकुळा माळी यांची बदली रत्नागिरीचे जिल्हा उपनिबंधक म्हणून झालेने नंतर करवीर तालुक्यांचे सहाय्यक निबंधक मा. सुनिल धायगुडे यांच्याकडे या पदाचा अतिरीक्त कार्यभार दिलेला होता. श्री. धायगुडेसो यांनी कार्यभार स्वीकारलेनंतर वसुली कक्षाच्या कामकाजाला गतीमानता आली होती. वसुली कक्षाकडील अधिकारी आणि कर्मचारी यांनी दाव्यांचे निकाल तत्पर मिळणेकामी केलेल्या सहकार्याबद्दल असोसिएशन त्यांचे आभारी आहे. श्री. धायगुडेसो यांच्या उभयपक्षी बाजू ऐकून घेऊन तत्पर निकाल देण्याच्या कार्यवाहीमुळे बँकांची थकबाकी अटोक्यात

## * संचालक मंडळ व सेवक वृंद

अहवाल सालात संचालक मंडळाच्या ९ तर कर्मचारी उपसमितीची १ सभा झालेल्या आहेत. तसेच संचालक मंडळ नियुक्त बँक्स असोसिएशन पारितोषीक माहिती व तंत्रज्ञान सल्ला अधिकारी समुहांच्या बैठक, पिग्मी एजंटस, भविष्य निर्वाह निधी योजना याचिका प्रकरणी चर्चा करणेसाठी सदस्य बँकांच्या बैठका गरजेप्रमाणे घेणेत आलेल्या आहेत.

सन २०१७-१८ अहवाल वर्षात नागरी बँका प्रतिमा संवर्धन मोहीम, प्रशिक्षण केंद्राचे नुतनीकरण, पिग्मी एजंट भविष्य निर्वाह निधी योजनेबाबत प्राव्हीडंड कार्यालयाकडील प्रश्न, वित्तीय निर्धारण व ठेव विमा कायद्यातील नागरी बँकाना जाचक ठरणाऱ्या अटीवर बँक संचालकांचे प्रबोधन, रिझर्व्ह बँकेने व्यवस्थापक मंडळ नेमणेबाबत काढलेल्या परिपत्रकाविषयी बैठका आयोजनाचे निर्णय संचालक मंडळाने घेवून तत्पर कार्यवाही केलेली आहे. तसेच सहकारी कायद्यात नागरी बँकासाठी उपयुक्त असणाऱ्या सुधारणा करणेसाठी कायदा सुधार समितीकडे पाठपुरावा, छत्रपती शिवाजी महाराज

सहकारी बँकात विद्यार्थी खाती उघडणेसाठी राज्य शिक्षण परिषदेकडे तगादा पंतप्रधान आवास योजना व अण्णासो पाटील आर्थिक विकास महामंडळाचे अनुदान/कर्ज नागरी बँकाचे कर्जदारांना उपलब्ध व्हावीत म्हणून बँकांची कार्यशाळा, रोकड विरहीत बँकींग सुविधासाठी शासकीय-निमशासकीय संस्था कडून आकारले जाणारे शुल्क कमी करणे, वित्तीय निर्धारण व ठेव विमा विधेयकातील अवाजवी कलमे रद्द करणेसाठी केंद्रीय अर्थमंत्र्यांना निवेदन इ. विषयावर संचालक मंडळाने विचार करून सदस्य बँकांच्या विविध स्तरावरील समस्या अडचणींचे निराकरण करण्याच्या प्रयत्न केला आहे. अशा अनेकविध विषयांवर संचालकांचे बौद्धीक योगदान आणि दैनंदिन कामकाजात क्रियाशील सहकार्य मिळालेले आहे. त्याबद्दल सहकारी संचालकांचा मनस्वी आभारी आहे.

अहवाल वर्षाखेर असोसिएशनकडे मुख्य अधिकाऱ्यासह पाच सेवक कार्यरत होते. सेवक वर्गांनी प्रामाणिकपणे काम करून असोसिएशनचे कामकाजाला गतीमानता देण्याचा प्रयत्न केला आहे. याबद्दल

## ❋ प्रशिक्षण व प्रबोधन

सहकार कायदा कलम २४ (अ) प्रमाणे शासनाने अधिसुचित केलेल्या संस्थाकडून सभासदांना शिक्षण व पदाधिकारी कर्मचारी यांना प्रशिक्षण दिले तरच ते विधीग्राह्य धरले जात असल्याने आपल्या असोसिएशनच्या महाराष्ट्र राज्य सहाकारी संघ, डॉ. वि.खे. पाटील सहकारी प्रबंध संस्थान, वैकुंठ मेहता राष्ट्रीय सहकारी प्रबंध संस्थान या राष्ट्रीय स्तरावरील शासनमान्य संस्थाबरोबर शिक्षण/प्रशिक्षणाबाबत सामजस्य करार केलेले आहेत. ज्या बँकाना अशा संस्थांचे प्रशिक्षण व प्रमाणपत्रे आवश्यक असतील त्यांचेकरिता असोसिएशन मार्फत प्रशिक्षण घेतले जाते. प्रशिक्षण केद्रांची जागा अपुरी पडू लागल्याने संचालक मंडळ सभागृह एकत्र करून अद्यावत ध्वनीयंत्रणेसह केंद्राचे नुतनीकरण केले आहे. हॉटेलमध्ये प्रशिक्षणासाठी होणारा अनाठायी खर्च कमी करून माफक शुल्कात उत्तम शिक्षण-प्रशिक्षण देण्याचा आमचा प्रयत्न राहणार आहे. त्याचा फायदा सर्व बँकानी घ्यावा अशी विनंती आहे.

अहवाल वर्षात आयकर कायद्यातील बदल, सहकार कायद्यातील सुधारणा, वित्तीय निर्धारण व ठेव विमा विधेयक २०१७, नादारी व दिवाळखोरी कायदा इत्यादी नवीन कायद्याबाबत बँकांचे पदाधिकारी, अधिकारी आणि कर्मचारी यांना माहिती प्रशिक्षण दिली आहे. ग्राहकसेवा, तंत्रज्ञायुक्त बँकींग व त्यामधील धोके, रिझर्व्ह बँकेकडील स्वच्छ चलन धोरण, मनुष्यबळ ग्राहक पतमानांकन, कर्ज मुल्यांकन वसुली व्यवस्थापन, माहिती व तंत्रज्ञान लेखापरिक्षण प्रोत्साहन प्रशिक्षण कार्यक्रमाना सांगली-सातारा जिल्ह्यातील बँकानाही सामवून घेण्याची परंपरा पुढे चालू ठेवलेली आहे. शिक्षण प्रशिक्षणाबरोबरच बँकातील कर्मचारी पदोन्नती लेखी परिक्षा, मौखिक मुलाखातीद्वारे घेवून मनुष्यबळाची गुणवत्ता वाढवण्याचा प्रयत्न केला आहे.

प्रशिक्षण कार्यक्रमासाठी आपल्याच सदस्य बँकातील अधिकारी यांना प्रोत्साहीत करून प्रशिक्षण वक्ते म्हणून संधी देण्याचा प्रयत्न केला जात आहे.

## * सदस्य बँकाची प्रगती व पारितोषिके योजना

देशपातळीवर व्यापारी व सरकारी बँकात आर्थिक घोटाळे घडत असताना असोसिएशनच्या सदस्य बँका आपल्या गुणात्मक प्रगतीमध्ये सातत्य ठेवून आहेत. देशातील अनेक मोठ्या बँका तोट्यात जात असताना सहकारी बँका नफ्यात आहेत. सरकारी बँकाचा ढोबळ एनपीए १० टक्केपेक्षा जास्त असताना आपल्या बँकाचा एनपीए ५ टक्क्यापेक्षा कमी आहे. यावरून आपल्या बँका अत्यंत कार्यक्षमपणे कार्यरत आहेत आणि गतीमान प्रगतीपथावर आहेत हे खालील सन २०१८ चे आकडेवारीवरून स्वयंस्पष्ट होत आहे.

| तपशील | आकडे कोटीत |
|---|---|
| भागभांडवल व निधी | ११८४.६६ |
| ठेवी | ९५३०.७६ |
| कर्जे | ५९९८.८९ |
| गुंतवणूक | ३७११.६६ |
| एकत्रित व्यवसाय | १५५२९.६५ |
| नक्त नफा | ७०.६१ |
| शाखा संख्या | ४६७ |
| कर्मचारी संख्या | ३७७३ |
| बहुराज्य बँका (Multi State Bank) | ४ |
| शेड्युल्ड बँका | १ |
| शाखारहीत बँका (Unit Banks) | ६ |
| सर्वसाधारण बँका (Licensed) | ४६ |
| नियमीत सदस्य बँका | ४७ |
| नाममात्र सदस्य बँका | १० |

भारतीय रिझर्व्ह बँकेच्या अध्यादेशानुसार भांडवल पर्याप्तता, नफाक्षमता व अनुत्पादक जिंदगीचे प्रमाण हे निकष जवळ जवळ सर्वच सदस्य बँका पूर्ण करित आहेत. त्यामुळे आर्थिकदृष्ट्या सक्षम व व्यवस्थापकीयदृष्ट्या उत्तम (Financialy Sound and Well Managed Banks) असणाऱ्या बँकांच्या यादीत बहुतांशी बँकांचा समावेश आहे. सदस्य बँकांनी संपादन केलेल्या या गुणात्मक प्रगतीमागे बँकांचे चेअरमन, संचालक व सेवकवृंदाचे अथक परिश्रम आहेत, यात शंका नाही. त्यांच्या

कोल्हापूर जिल्ह्यातील नागरी सहकारी बँकाचे पालकत्व स्वीकारलेली जिल्हास्तरीय शिखर संस्था या नात्याने असोसिएशन आपली जबाबदारी पार पाडण्याचा प्रयत्न करित आहे. बँकाच्या समस्या सोडविणे बरोबरच त्यांच्या उत्तम कामगिरीबद्दल त्यांचे कौतुक करणेही आमचे कर्तव्य आहे, म्हणूनच सन २०१७ पासून ठेवनिहाय्य गटवार पारितोषिके देण्याचा उपक्रम सुरू केला आहे. या उपक्रमामध्ये एकूण ३० बँकांनी सहभाग घेतला होता. या बँकाकडून आलेल्या प्रस्तावांची निष्पक्ष छाननी व्हावी म्हणून दोन सेवानिवृत्त मुख्य कार्यकारी अधिकारी व एक सनदी लेखापाल यांची पारितोषिक निवड समिती नेमली होती या समितीने प्रस्तांवाची छाननी करुन दि. ३१ मार्च २०१७ वर्षाखेरीच्या उत्तम प्रगतीप्रित्यर्थ खालील बँकांची सन २०१७ चे पारितोषीकासाठी निवड केलेली आहे.

**अ) २५१ कोटीवरील ठेवी गट क्रमांक १ :**
श्री वीरशैव-को-ऑपरेटीव्ह बँक लि.कोल्हापूर (मल्टी स्टेट बँक)

**ब) १०१ ते २५० कोयीपर्यंत ठेवी गट क्रमांक २ :**
सन्मती सहकारी बँक लि. इचलकरंजी (मल्टी स्टेट बँक)

**क) ५१ ते १०० कोटीपर्यंत ठेवी गट क्रमांक ३:**
दि व्यंकटेश्वरा सहकारी बँक लि. इचलकरंजी

**ड) ५० कोटीपर्यंत ठेवी गट क्रमांक ४ :**
विश्वनाथराव पाटील मुरगुड सहकारी बँक लि. मुरगुड

पारितोषिक विजेत्या बँकाचे चेअरमन, संचालक व कर्मचारी यांचे मी मनापासून अभिनंदन करतो. तसेच जास्तीत जास्त बँकानी या उपक्रमात सहभागी व्हावे आणि प्रस्ताव वेळेत सादर करावेत असे

## * संकल्प व समारोप

सन, २०१८-१९ मध्ये बँक संचालक अधिकारी यांचे अभ्यास दौरे आयोजित करणे, बँकांतील सध्याच्या नवनियुक्त कर्मचारी यांना माहिती तंत्रज्ञानाचे बऱ्यापैकी ज्ञान असले तरी प्रत्यक्ष बँकींग व्यवहाराची जाण फारच कमी आहे. त्याकरिता विशेष प्रशिक्षण कार्यक्रमांचे आयोजन करणे, बँकेतील श्रेणीनिहाय्य कर्मचारी/अधिकारी वर्गासाठी निरंतर कार्यशाळा सुरु करणे, तंत्रज्ञानयुक्त बँकींगमधील धोक्यांच्या व्यवस्थापनाची माहिती व्हावी म्हणून कार्यशाळा आयोजित करणे, वेबसाईट सुरू करणे, सभासद शिक्षण पुस्तिका काढणे, १०१ वसुली दाखल्यातील बँकाकडील आढावा बैठका घेणे इत्यादी

सन १९९२ मध्ये गुजरातस्थित माधवपुरा बँक घोटाळा प्रकरणापासून नागरी सहकारी बँकाना ग्रहण लागले आहे. रिझर्व्ह बँकेची वक्रदृष्टी तेव्हापासून आपल्या बँकांवर आहे. या वक्रदृष्टीमुळे गेल्या काही वर्षात सुमारे ५०० बँकांची आहुती गेलेली आहे. पुढील पाच वर्षाच्या काळात रिझर्व्ह बँकेच्या दूरदृष्टीचा आराखडा (VISION DOCUMENT) धोरणाप्रमाणे आणि डेप्युटी गर्व्हनर श्री. एन्. एस. विश्वानाथन
यांच्या दि. २४ ऑगस्ट २०१८ रोजी गुजरात फेडरेशन कार्यक्रमात दिलेल्या भाषणातील गर्भीत इशारा विचारात घेता येत्या काही वर्षात साधारण आणखी १००० बँका कमी होतील अशी भिती आहे.

सहकारातील अभ्यासू अनुभवी व्यक्तीमत्व मा. सतीशजी मराठे यांची रिझर्व्ह बँकेचे संचालकपदी नियुक्ती झालेली आहे. त्यामुळे नागरी सहकारी बँकाच्या आशा पल्लवीत झालेल्या आहेत. सहकाराची शक्ती आणि बँकाची दु:खणी मांडणारा आपला नेता आता रिझर्व्ह बँकेच्या धोरण ठरवणाऱ्या उच्चत्तम मंडळावर विराजमान झाला आहे. आपल्या नागरी बँकांचे प्रश्न अत्यंत धडाडीने मांडून सहकारी बँकाचे अस्तित्व अबाधित ठेवण्यासाठी ते नक्कीच प्रयत्न करतील अशी अपेक्षा ठेवून त्यांच्या निवडीबद्दल कोल्हापूर जिल्ह्यातील सर्व सहकारी बँकाच्या वतीने मी त्यांचे हार्दिक अभिनंदन करतो.

सहकार खाते व रिझर्व्ह बँक असे द्रिपक्षीय नियंत्रण सहकारी बँकावर आहे. हे रिझर्व्ह बँकेला मान्य नाही. म्हणून संचालक मंडळाबरोबर व्यवस्थापक मंडळ (Board of Management)नियुक्ती करण्याचा इरादा रिझर्व्ह बँकेने पक्का केल्याचे दिसत आहे. त्याअनुषंगाने बँकाच्या पोटनियमांत दुरुस्ती करण्याबद्दल मसुदा परिपत्रक दि.२५/०६/२०१८ रोजी बँकाना पाठवून त्यावर सूचना व मते मागविली दिली आहेत. या दुरूस्तीनंतर रिझर्व्ह बँकेला व्यवस्थापक मंडळ आणि मुख्य कार्यकारी अधिकारी यांना बडतर्फ करणेचा अधिकार प्राप्त होणार आहे. एकाच बँकेत दुसरे व्यवस्थापक मंडळ निर्माण झालेने सभासदांनी लोकशाही मार्गाने निवडून दिलेल्या संचालक मंडळाचे अधिकारावर गदा येणार आहे. याउलट त्यांनी घेतलेल्या निर्णयाला संचालक मंडळ जबाबदार राहणार आहे. सहकारी बँकांचे वाढीला मारक असणाऱ्या रिझर्व्ह बँकेच्या या निर्णयाविरूध्द असोसिएशनने दि. २१ जुलै २०१८ रोजी रिझर्व्ह बँक, राज्य फेडरेशन, नॅशनल फेडरेशनकडे निवेदन पाठविले आहे. तथापी देशपातळीवरून कितीही विरोध झाला तरी व्यवस्थापन मंडळ आपणावर लादणारच अशीच आजची अवस्था आहे. त्यामुळे रिझर्व्ह बँक आपल्या बँकांच्या व्यवस्थापनावर व दैनंदिन कारभारावर प्रत्यक्ष अंकुश यापुढे ठेवणार यात आता शंका नाही. त्यादृष्टीने बँकांनी उत्तम प्रशासन. प्रगल्भ व्यावसायिकता आणि रिझर्व्ह बँक मार्गदर्शक तत्वांना धरूनच धोरणे आखून भविष्यात बँक चालवावी लागणार आहे. त्याअनुषंगाने योग्य पाऊले आताच सदस्य बँकानी उचलावीत असे मी आवाहन करतो आहे.

व्यायसायिक स्पर्धेबरोबरच उच्चपदस्थ सक्षम मनुष्यबळाची कमतरता, माहिती व तंत्रज्ञानावर

आर्थिक गुन्हे, हल्ले थोपविण्यासाठी निर्माणकरावयाची संगणकीकरणाची खर्चीक यंत्रणा व माहिती तंत्रज्ञानातील प्रामाणिक मनुष्यबळाची कमतरता,त्यांच्या वेतनावर करावा लागणारा भरमसाठ खर्च, रिझर्व्ह बँक – सरकार यांची सहकाराबद्दलची अनास्था अशा अनेक समस्यातून सहकारी बँकाना पुढची पाच वर्षे टिकून राहवयाचे आहे. त्याचबरोबर येत्या पाच वर्षात डिजीटल बँकीगचे युग, (Digital Banking Era) कोणत्याही बँकेचे खातेतील व्यवहार कोणत्याही बँकेतून उपलब्ध (Bank Account Portability ) देशपातळीवर एक व्यक्ती एक खाते (Aadhar Based Block Chain) असे क्रांतीकारी बदल बँकींग व्यवहारात होणार आहेत. यासाठी बँकांनी तंत्रज्ञानयुक्त बँकींगवर लक्ष केंद्रीत करून अद्यावत यंत्रणा व त्यासाठी सक्षम मनुष्यबळ निर्माण करणे गरजेचे आहे. यासाठी आवश्यक असणारे मार्गदर्शन असोसिएशन देण्यास कटिबध्द आहे याची मी आपणांस ग्वाही देतो.

## * आभार


आपल्या असोसिएशनला अप्पर आयुक्त मा. उत्तमराव इंदलकर जिल्हा उपतनिबंधक मा.अरुण काकडे, उपनिबंधक मा. संभाजीराव निंबाळकर इत्यादी अधिकारी आणि रिझर्व्ह बँक सहकार खाते, आयकर विभाग अन्य शासकीय व निमशासकीय कार्यालये, सामाजिक संस्था, बँका आणि त्यांचे पदाधिकारी, अधिकारी, कर्मचारी यांनी कामकाजात प्रत्यक्ष अप्रत्यक्ष सहकार्य केलेले आहे. असोसिएशनच्या काही सदस्य बँकांनी गरजेवेळी मनुष्यबळ, साधन–सुविधा उपलब्ध करून दिलेल्या आहेत. त्याबद्दल सर्वांचा मी मन:पुर्वक आभारी आहे.

अहवाल वर्षातील कामकाजाचा आढावा आणि दि. ३१ मार्च २०१८ अखेरची आर्थिक पत्रके, पुढील वर्षीचे अंदाजपत्रक, मागील अंदाज पत्रकापेक्षा जादा झालेला खर्च, लेखापरिक्षण दोष दुरुस्ती अहवाल, पुढील वर्षीचा कार्यक्रम इत्यादी पत्रके सभेपुढे विचारार्थ सादर केलेली आंहेत. त्यास आपण

**जय सहकार**

**मा. संचालक मंडळाचे वतीने**

**दि. १४ सप्टेंबर २०१८**




**श्री. निपुणराव कोरे**
अध्यक्ष

# * ऋण निर्देश *

सहकार विशेषतः बँकींग क्षेत्रात कित्येक तपे दिपस्तंभाप्रमाणे मार्गदर्शकाची भूमीका सक्षमपणे ज्यांनी पार पाडली. आज सहकारी बँकींग एका संक्रमण अवस्थेतून मार्गक्रमण करित असताना ज्यांच्या कणखर नेतृत्वाची व अनुभवी विचारांची उणीव

# भावपुर्ण श्रद्धांजली

माजी पंतप्रधान भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी, केरळमधील
नैसर्गिक आपत्ती व असोसिएशनचे माजी सचिव चंद्रकांत पिसे तसेच
सहकार, शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, इत्यादी क्षेत्रातील
महनीय व्यक्ती सैन्यदलातील जवान आणि मानवजातीसाठी
त्यागी वृत्तीने कार्य केले व निधन पावले अशा
ज्ञात-अज्ञात व्यक्ती तसेच सदस्य बॅकांचे
सभासद निर्वतले अशा सर्वांना असोसिएशन तर्फे



## दिनांक ३१/०३/२०१८ रोजीचा ताळेबंद

| दि. ३१ मार्च २०१७ | भांडवल व देणी तपशील | पोट रक्कम | दि. ३१ मार्च २०१८ |
|---|---|---|---|
| -- | **भांडवल / निधी** | -- | ३,३५,५०,९६२.१२ |
| ९१,३६,४४८.०० | राखीव निधी | १,०१,००,००१.०० | |
| ५७,००,०००.०० | इमारत निधी | ५९,००,०००.०० | |
| ६,००,५०७.९५ | प्रशिक्षण निधी | ६,००,५०७.९५ | |
| १३,६६३.५० | अधिवेशन निधी | १३,६६३.५० | |
| ३,००,०००.०० | सभा समारंभ निधी | ३,००,०००.०० | |
| २३,४८,३७०.१७ | इमारत घसारा निधी | २५,९४,६८३.१७ | |
| ८८,०५,४०२.६८ | संभाव्य देयता निधी | ९९,०७,७५८.३५ | |
| ८,५६,७९७.१५ | तंत्रविकास निधी | ८,५६,७९७.१५ | |
| ५,३०,०००.०० | बँक्स संचालक अभ्यास दौरा निधी | ५,३०,०००.०० | |
| १,४२,६१६.०० | तंत्र विकास निधी | १,४२,६१६.०० | |
| २,००,०००.०० | नैसर्गिक आपत्ती निधी | २,००,०००.०० | |
| २०,४७,०००.०० | प्रशिक्षण केंद्र निधी | २१,०४,९३५.०० | |
| १,००,०००.०० | बँक ठेव संशयीत निधी | १,००,०००.०० | |
| १,००,०००.०० | पारितोषिक निधी | २,००,०००.०० | |
| | **देणी** | | १०,३१,२६६.५८ |
| ५८,५००.०० | याचिका फी अनामत | ५८,५००.०० | |
| ३८,०००.०० | लेखापरिक्षण फी देणे | ५४,७२५.०० | |
| २६,९६१.०० | देणे बील्स् | ८,५४४.०० | |
| ८६,६०९.०० | अधिलाभांश/सानुग्रह अनुदान | १,०१,९११.०० | |
| १,०००.०० | आयकर देणे | २,२२५.०० | |
| ९२५.०० | व्यवसाय कर देणे | ७७५.०० | |
| १,५०,०००.०० | स्थानापन्न भत्ता देणे | -- | |
| ३,२२,७८६.५० | असोसिएशन देणे (दुबेरजी नोंद) | ४,९९,८३४.५८ | |
| -- | सल्ला फी देणे | ९,३८०.०० | |
| -- | प्रशिक्षण फी देणे | १,४१६.०० | |
| -- | जीएसटी देणे | ७३,७४६.०० | |
| -- | ॲडव्हान्स प्रशिक्षण फी | ९,७१०.०० | |
| -- | वार्षिक वर्गणी (दुबेरजी नोंद) | ८५,५००.०० | |
| -- | याचिका खर्च देणे | १,२५,०००.०० | |
| २४,२३,८४३.६७ | **वाढवा** | | २५,८४,३६२.०८ |
| **३,३९,८९,४३०.६२** | **एकूण** | | **३,७१,६६,५९०.७८** |

**श्री. शंकर मांगलेकर**
मुख्य कार्यकारी अधिकारी

सदर दिनांकीत अहवालाप्रमाणे

**सीए सुशांत फडणीस**
सुशांत फडणीस आणि कंपनी
सनदी लेखापाल, वैधानिक लेखापरिक्षक

श्री. विजय भोसले
श्री. अरुण आलासे
श्री. दत्तात्रय थोरावडे
सौ. दिपा मिसाळ

श्री. अशोक सौंदत्तीकर
श्री. शिरीष कणेरकर
श्री. प्रकाश पुजारी
श्री. दत्तात्रय राऊत

श्री. राजेंद्र जाधव
श्री. सुर्यकांत पाटील
श्री. आनंदाराव भोपळे
श्री. विश्वास चौगले

श्री. विठ्ठल मोरे
श्री. विलास नाईक
सौ. विजया जाधव

## दिनांक ३१/०३/२०१८ रोजीचा ताळेबंद

| दि. ३१ मार्च २०१७ | जिंदगी व येणी | पोट रक्कम | दि. ३१ मार्च २०१८ |
|---|---|---|---|
| -- | **रोख व बँकेतील शिल्लक** | -- | ६,५८,०१०.७२ |
| ५५९.०० | अ) रोख शिल्लक | ५४८.०० | |
| १,९२,७५९.६२ | ब) सेव्हींग्ज खाते | ६,५७,४६२.७२ | |
| | **गुंतवणूक** | | ३,०५,००,०००.०० |
| २,९०,००,०००.०० | मुदत ठेवी | | |
| | **मालमत्ता** | | ३४,५६,४५७.०० |
| १८,३९,७७४.०० | असोसिएशन कार्यालय | १८,३९,७७४.०० | |
| ६,२३,३६२.०० | वसुलीकक्ष कार्यालय | ६,२३,३६२.०० | |
| ८,७२,०६८.०० | फर्निचर, फिटींग, फिक्चर्स | ७,८४,८६१.०० | |
| ९३,६२०.०० | इमारत फिंटींग्ज् फिक्चर्स | १,०९,००८.०० | |
| ८४,५७२.०० | डेडस्टॉक | ७२,९९१.०० | |
| ८,५२५.०० | ग्रंथालय | ७,६७३.०० | |
| २०,८७६.०० | इलेक्ट्रीक, फिटींग, फिक्चर्स | १८,७८८.०० | |
| | **इलेक्ट्रीकल् इक्विपमेंटस्** | | २,१७,६०९.४८ |
| ९,०८८.०० | ई. पी.बी.एक्स | २६,३९१.०० | |
| ८,८४९.०० | इनव्हर्टर व बॅटरी | २५,५१५.०० | |
| १,६२,२१३.४८ | ए. सी. यंत्रणा | १,४५,९९२.४८ | |
| १८,१७६.०० | एल.सी.डी. प्रोजेक्टर | १६,३५८.०० | |
| -- | ध्वनी यंत्रणा | ३,३५३.०० | |
| ३८,८८२.०० | **संगणक व प्रिंटर** | | २५,९२३.०० |
| | **इतर येणी** | | २३,०८,५९०.५८ |
| २४,८८१.०० | टेली./वीज बयाणा | २४,८८१.०० | |
| ५,६५,३३९.०२ | येणे व्याज | ७,११,२१५.०० | |
| १,६००.०० | सिलेंडर व रेग्युलेटर बयाणा | १,६००.०० | |
| ६,०००.०० | प्रशिक्षण वर्गणी येणे | ५,०००.०० | |
| ४५,५००.०० | वार्षिक वर्गणी येणे | २५,५००.०० | |
| ३,२२,७८६.५० | वसुली कक्ष येणे (दुबेरजी नोंद) | ४,९९,८३४.५८ | |
| ५०,०००.०० | आगाऊ प्रोसेस फी भरणा | ५०,०००.०० | |
| | येणे वार्षिक वर्गणी (नियमित) | ५७,५००.०० | |
| | येणे वार्षिक वर्गणी (नाममात्र) | २८.०००.०० | |
| | येणे जीएसटी | २४,६६०.०० | |
| | येणे याचिका फी | १,२५,०००.०० | |
| | येणे सर्व्हिस टॅक्स (अंडर प्रोटेस्ट) | ७,५५,४००.०० | |
| **३,३९,८९,४३०.६२** | **एकूण** | | **३,७१,६६,५९०.७८** |

| | | |
|---|---|---|
